अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# चीनच्या छुप्या अजेंड्याकडे दुर्लक्ष करणे धोक्याचे

गेल्या दहा वर्षांत भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर किती नवीन मित्र मिळवले, हे शोधावे लागेल. पण ज्यांना आपण सख्खे शेजारी म्हणू त्यांच्याशी फारसे सौहार्दपूर्ण संबंध राहिलेले नाही हे स्पष्टपणे दिसते. अन्यथा चीनसारख्या शेजारी राष्ट्राला आपल्या या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये संरक्षणावरील खर्च दुप्पट करण्याची वेळ आली नसती. जगातले अनेक देश स्वत:च्या संरक्षण सिद्धतेसाठी दरवर्षी चार-पाच टक्क्याने ज्यादा खर्चाची तरतूद करतात. पण चीनने यावर्षी अमेरिकेलाही मागे टाकून आपला संरक्षण खर्च जवळपास शंभर टक्के वाढवला आहे, असेच म्हणावे लागेल. अशा परिस्थितीतच चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांनी अलीकडे केलेले विधान त्या देशाच्या छुप्या महत्त्वाकांक्षेवर प्रकाश टाकते. चीन आपल्या एकेक इंच भूमीसाठी लढत राहील आमच्याशी कोणी आगळीक केली तर त्याला जशाच तसे उत्तर दिले जाईल. अशा प्रकारचा विषारी फुत्कार चीनच्या ड्रॅगनने काढला आहे. संरक्षण खर्चासाठी चीनने केलेली प्रचंड वाढ आणि चीनच्या मंत्र्यांचे हे प्रक्षोभक विधान या दोन्ही गोष्टींचा अर्थ काढला तर चीनच्या मनामध्ये वेगळेच कारस्थान शिजते आहे, असे म्हणावे लागेल. भारताच्या दृष्टीने विचार केला तर जवळपास गेल्या पाच वर्षांपासून वेगवेगळ्या पद्धतीने कुरापती उकरून काढण्याचे काम चीन करत आहे. प्रामुख्याने अरुणाचल प्रदेशामध्ये उघड उघड घुसखोरी करण्याचा प्रयत्न तसेच तिबेटला लागून असलेल्या सीमेवर महामार्ग उभारण्याचा प्रयत्न किंवा सीमेलगतच काही धावपट्ट्या उभारून सतत आपल्या लष्कराची वर्दळ सुरू ठेवण्याचा उद्योग, ब्रह्मपुत्रा नदीचे पाणी अडवण्याचे कारस्थान एवढेच नव्हे तर पाकिस्तानशी मैत्री करण्याचा चीनचा डाव ब्रह्मदेश किंवा श्रीलंकेच्या मदतीला धावून जाण्याचे चीनचे नाटक या सगळ्या गोष्टी स्वत:चा प्रभाव वाढवण्यासाठी चाललेल्या आहेत हे लपून राहात नाही. भारतासाठी मात्र त्याच्या या सगळ्या कुरापती निश्चितच धोकादायक म्हणाव्या लागतील. भारताबरोबर आपले चांगले संबंध असावेत असा देखावा चीन कितीही करत असला तरी त्याचा छुपा अजेंडा वेगळा आहे. मैत्रीच्या माध्यमातून तो हळूहळू भारतावर कुरघोडी करत असल्याचेच दिसून येते. त्याची एकेक पावले ही त्याच दिशेने पडत आहेत. जेणेकरून आपली भारताला भीती वाटली पाहिजे, असेच वर्तन ठेवण्याचा जाणूनबुजून चीन प्रयत्न करत आहे.

## अमेरिकेला आव्हान देण्याची सिध्दता

आज आंतरराष्ट्रीय पातळीवर चीनला असे वाटते की अमेरिकेला आव्हान देण्याची ताकद आता फक्त आपल्यामध्येच आहे. अनेक ठिकाणी दुभंगलेला रशिया आपली ताकद गमावून बसलेला आहे. आर्थिकदृष्ट्या रशिया पूर्वीसारखा प्रबळ राहिलेला नाही. त्याची जगामध्ये पंचवीस वर्षांपूर्वी जी ताकद होती ती तशीच्या तशी राहिलेली नाही, या पार्श्वभूमीवर चीन मात्र नियोजनपूर्वक सगळ्या आघाड्यांवर आपली ताकद वाढवण्याचा कसोशिने प्रयत्न करत आहे. आज तर तो अशा मनस्थितीत आहे की चीनला अमेरिकेचे वर्चस्व अजिबात मान्य नाही. तो अमेरिकेला भीकही घालत नाही. उलट अनेकवेळेला तर अमेरिकेला त्याच भाषेत आव्हान देण्याचा प्रयत्न करतो. अनेक मुद्दांवर आज ना उद्या अमेरिकेशी आपले खटके उडतील हेही तो जाणून आहे. अशा परिस्थितीत आपल्या आजूबाजूच्या शेजारी राष्ट्रांवर आपला देखील प्रभाव असला पाहिजे. स्वत:च्या भूमीचे संरक्षण करीत असताना व्यापार उद्योगाच्या माध्यमातून चीन आपली अर्थव्यवस्था भक्कम करीत चालला आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश म्हणून चीनकडे पाहिले जात होते. आता लोकसंख्येच्याबाबतीतही त्याने सुधारणावादी भूमिका घेतली. देशातील प्रत्येक नागरिकामध्ये राष्ट्रनिष्ठा कायम राहावी याचा तो काटेकोरपणे प्रयत्न करताना दिसतो. देशांतर्गत जे जे काही दोष किंवा तूटी होत्या त्या क्रमाक्रमाने दूर केल्या जात आहेत. आतापर्यंत चीनमध्ये झालेली राजकीय सत्तांतरे कोणताही मोठा संघर्ष न होता घडली असतानाही तिथे अनेक कायदे हे सामान्य माणसाची मुस्कटदाबी करणारे आहेत. तरीसुध्दा तिथे कोणताही मोठा उठाव होणार नाही याची काळजी चीनचे राज्यकर्ते घेत असतात. वीस वर्षांपूर्वी तिथे झालेला विद्यार्थ्यांचा उठाव अत्यंत क्रूरपध्दतीने चिरडून काढला गेला होता, तिथली बेकारी दूर करण्याच्या मुद्दावर चीनने बरेच लक्ष केंद्रित केलेले आहे. आणि सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे आज जगाच्या प्रत्येक देशामध्ये चिनी बनावटीची वस्तू जाऊन पोहचली आहे. भारतातल्या बाजारपेठेत जवळपास वीस ते पंचवीस टक्के वस्तू या चिनी बनावटीच्या असल्याचे आढळून येईल. यावरून आपल्या देशातील अंतर्गत व्यवस्था सुदृढ करत असताना आंतरराष्ट्रीय पातळीवर कोणाकडेही आपल्याला भीक मागावी लागणार नाही, असा प्रयत्न चीन करीत आहे.

## खिजवण्याचे प्रयत्न

चीनच्या या सगळ्या कुरापती भारतासाठी निश्चितच चिंताजनक ठरतात, कारण या देशाची नियत साफ नाही. छोट्या-छोट्या गोष्टींमधून सातत्याने आक्रमकता दाखवण्याचा डाव भारताला घाबरवण्यासाठीच आखलेला असतो. भारत नुसताच इशारा देत बसतो. चीनच्या बरोबरीने जर भारताने काही उपाय योजले आणि अगदी सीमावर्ती भागात चीनप्रमाणेच धावपट्ट्या किंवा रस्त्यांचे बांधकाम केले तर त्याचे परस्पर उत्तर दिल्यासारखे ठरू शकते. सीमेवर चीनचे सैनिक ज्या पद्धतीने तैनात आहेत त्या मानाने भारताची सीमेवरची सिद्धता खूपच तुटपुंजी दिसून येते. या गोष्टी लक्षात आल्यामुळेच चीनला आपल्या कारवाया करणे सोपे जात आहे. या कारवायांसाठी पैसा अपुरा पडू नये, हा उद्देश ठेवूनच त्याने आपल्या संरक्षण खात्याच्या अंदाजपत्रकात दुप्पट वाढ केली. एकीकडे पाकिस्तान, बांगलादेश या छोट्या शेजारी राष्ट्रांचे उपद्व्याप चालू असतानाच चीनसारख्या मोठ्या राष्ट्राने आणि तितक्याच तातडीने भारताला खिजवण्याचे प्रयत्न चालू ठेवले आहेत. ज्या अरेरावी पद्धतीने चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांनी विधाने केली आणि जशास तसे उत्तर देण्याची भाषा केली की, भारतासाठी एक इशारा ठरू शकतो. चीन स्वत: कोणतीच आगळीक करणार नाही. भारताला आगळीक करायला जो भाग पाडेल आणि त्यातून लागणाऱ्या आगीचा स्वत:साठी फायदा करून घेईल अशा चीनच्या या छुप्या अजेंड्याकडे दुर्लक्ष करणे भारताला फार जड जाऊ शकते.